**आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य जनजागृती शिवार फेरी  आणि विस्तार अधिकारी कर्मचारी कृषी विभाग यांचे सेंद्रिय, नैसर्गिक शेती प्रशिक्षणाचे आयोजन**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ कृषि विज्ञान केंद्र, धुळे, कृषि महाविद्यालय, धुळे, कृषि तंत्र विद्यालय, धुळे, कृषि विभाग, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य जनजागृती शिवार फेरी  आणि विस्तार अधिकारी कर्मचारी कृषी विभाग यांचे सेंद्रिय, नैसर्गिक शेती प्रशिक्षणाचे आयोजन कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे दिनांक २२.१२.२०२३ रोजी करण्यात आले होते.

आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य जनजागृती शिवार फेरीचे उद्घाटन  जिल्हाधिकारी, धुळे मा. श्री. अभिनव  गोयल सो. यांच्याहस्ते झाले. अध्यक्षस्थानी मा.डॉ.चिंतामणी देवकर, सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय, धुळे हे  होते तर श्री. कुरबान तडवी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, धुळे, श्री.नवनाथ कोळपकर, प्रकल्प संचालक, आत्मा, धुळे, डॉ.राहुल देसले, प्राचार्य, घटक कृषी तंत्र विद्यालय, धुळे, डॉ.दिनेश नांद्रे, कार्यक्रम समन्वयक, धुळे, कृषी भूषण शेतकरी श्री.श्रीराम पाटील, श्री.दिलीप पाटील, सर्व प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी,कृषी महाविद्यालय,कृषी तंत्र विद्यालय, धुळे, सर्व अधिकारी कर्मचारी कृविके, धुळे, उपविभागीय कृषी अधिकारी, धुळे, तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, धुळे  आदी मान्यवर उपस्थित होते.

शिवार फेरी नंतर प्रशिक्षणा दरम्यान अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. चिंतामणी देवकर, यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे  सेंद्रिय शेती मधील प्रकल्पाचे योगदान आणि संशोधनाचे उल्लेख करत उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच मानवी आहारात भरड धान्याचे महत्व लक्षात घेता त्याचे उत्पादन वाढीकडे लक्ष केंद्रित करण्यासठी महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या शिफारसीत तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त अवलंब करावा असे आव्हान उपस्थित विस्तार अधिकारी, कर्मचारी, प्रगतशील शेतकरी यांना केले.

प्रास्ताविकात डॉ. राहुल देसले यांनी आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित वर्षभर  कृषी विभाग, कृषि विज्ञान केंद्र, कृषी महाविद्यालय, कृषी तंत्र विद्यालय राबवीत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली तसेच मानवी आहारात भरड धान्याचे महत्व सांगत उपस्तीताना मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुण्याच्या मार्गदर्शनामधे. श्री. कुरबान तडवी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, धुळे यांनी कृषि विभागाच्या अधिकारी, कर्मचारी यांच्याशी सवांद साधत विविध योजना राबविताना सकारत्मक दृष्टीकोन ठेवत योजना जास्तीत जास्त शेतकऱ्यापर्यंत पोहचविण्याचे आव्हान करत मार्गदर्शन केले. तांत्रिक मार्गदर्शनामध्ये  डॉ.दिनेश नांद्रे, यांनी नैसर्गिक शेतीचे महत्व, त्यामधील आव्हाने, गरज यावर प्रकाश टाकत उपस्थितांना मार्गदर्शन केले. श्री. विनय बोरसे यांनी डॉ.पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती मिशन योजनेची सविस्तर माहिती देत मार्गदर्शन केले.यानंतर प्रगतशील शेतकरी श्री. श्रीराम पाटील व श्री.दिलीप पाटील यांनी आपला अनुभव कथन करत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संपूर्ण संचालन व आभार प्रदर्शन डॉ.धनराज चौधरी यांनी केले.

कार्यक्रमच्या यशस्वीतेसाठी कृषि विज्ञान केंद्र, धुळे चे सर्व शास्त्रज्ञ, कर्मचारी, कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी, कृषी महाविद्यालय व कृषी तंत्र विद्यालयाचे सर्व प्रध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.